**नि.दि.दावा. क्र. ४३/२०१६**
**गणपती वि. अंतू.**
**MHKO150001442016.**

## निशाणी क्रमांक ८५ वरील आदेश.

वादीने प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी हा दि.०८.०५.१९९५ रोजीचा करारनामा नाकारत असल्यामुळे अतिरिक्त पुरावा सादर करण्याकरीता दुय्यम निबंधक, आजरा यांना साक्षीसमन्स काढण्यासाठी सादर केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादीने दि. ०८.०५.१९९५ रोजी वादातील करारनाम्याचा स्टॅंप घेतलेला असून त्याबाबतच्या नोंदी समोर निशाणी अंगठा केलेला आहे. वादीने नि. क्र.५६ च्या यादीसोबत दुय्यम निबंधक, श्रेणी-१, आजरा यांच्याकडील जनरल स्टॅंप विक्री नोंदवहीचा उतारा हजर केला आहे. सबब, त्याबाबतचा पुरावा सादर करण्याकरीता अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादीने नि. क्र.८६ प्रमाणे लेखी म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, त्याने वादीसोबत कोणताही करारनामा केलेला नसून तो गहाळ झाल्याचे खोटे कथन केले आहे. वादीने नि. क्र.५६ सोबत खोटी प्रत दाखल केली आहे. वादीने अद्याप पर्यंत निशाणी अंगठयाची तज्ञाकडून तपासणी करण्याची मागणी केलेली नाही. तसेच वादी मागणी करत असलेले रजिस्टर संबंधित कार्यालयात उपलब्ध असल्याचा देखील पुरावा दिलेला नसल्यामुळे अर्ज नाकारण्याची विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादीच्या विधिज्ञांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादीच्या विधिज्ञांनी प्रतिवादी हा करार झाल्याची बाब नाकारत असून मूळ करारनामा गहाळ झाल्यामुळे वादीला त्याचा दावा सिध्द करण्यासाठी सदर पुराव्याची आवश्यकता असल्याचे कथन केले आहे. तर प्रतिवादीच्या विधिज्ञांनी करारनाम्यासह नोंदीची बाब नाकारुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीने नि. क्र.५६ सोबत दाखल केलेल्या उता-याचे अवलोकन केले. सदर नोंदी प्रमाणे प्रतिवादीने दस्त खरेदी केल्याबाबतची नोंद घेण्यात आलेली आहे. जरी वादीने निशाणी अंगठयाच्या तुलनात्मक निरीक्षणाची मागणी केलेली नसली तरी त्याला

प्रतिवादीने दस्त खरेदी केल्याची बाब इतर पुराव्याआधारे सिध्द करता येऊ शकते. तसेच वादीने दुय्यम निबंधक, श्रेणी– १, आजरा यांच्याकडील दि.०८.०५.१९९५ रोजीच्या जनरल स्टॅंप विक्री नोंदवहीची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. सबब, प्रतिवादीचा वादीने मागणी केलेले रजिस्टर संबंधित कार्यालयात उपलब्ध आहे किंवा नाही याचा पुरावा दिला नसल्याचा बचाव मान्य करता येऊ शकत नाही.

५. वादीने केवळ प्रतिवादीने स्टॅंप खरेदी केल्याचा पुरावा सादर करण्याकरीता साक्षीसमन्सची मागणी केलेली आहे. वादीला त्याचा दावा सिध्द करण्यासाठी आवश्यक ती संधी देणे न्यायोचित असून अर्ज मंजूर केल्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार असून त्याला न्यायाच्या नैसर्गिक हक्कापासून वंचित ठेवले जाऊ शकते. सबब, मी वरील विवेचनावरुन न्यायाच्या दृष्टीने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## <u>आदेश</u>

१. अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. दुय्यम निबंधक, श्रेणी–१, आजरा यांना वादीच्या अर्जातील मागणी प्रमाणे साक्षीभत्ता भरल्यानंतर साक्षीसमन्स काढण्यात यावे.

३. वादीने आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

न्या. अ. सं. क्र.–महा.०२८९७

दिनांक – १२.०१.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.